## निशाणी क्र. ५१ वरील आदेश

वादीने उप-अधिक्षक भुमी अभिलेख बार्शी यांनी दिलेल्या अहवालात गट नं. ९६० मध्ये गट नं. ९५९ चे किती अतिक्रमण आहे हे स्केलमध्ये नमूद केलेले नाही म्हणून ते अतिक्रमण क्षेत्र किती आहे याचे स्केलमध्ये अंतर नमूद करण्यास उप-अधिक्षक भुमी अभिलेख यांना आदेशित करण्यासाठी विनंती केली आहे. या अर्जास प्रतिवादीचे म्हणणे सादर करण्यास आदेशीत केले परंतु त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दिले नाही. म्हणून हा अर्ज प्रतिवादीच्या म्हणण्याविना चालविण्यात येत आहे.

२. वादी यांच्या विद्वान वकीलांना ऐकले. माझे पुर्व अधिकारी यांनी निशाणी क्र. ७ वर आदेश पारित करुन उप-अधिक्षक भुमी अभिलेख बार्शी यांना यांना कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्त केले व गट नं. ९६० व गट नं. ९५९ ची मोजणी करण्यासाठी आदेशीत केले. त्याप्रमाणे उप-अधिक्षक भुमी अभिलेख बार्शी यांनी निशाणी क्र. ५० वर अहवाल दिला. या अहवालास वादीने मान्यता दिली परंतू प्रतिवादीने म्हणणे सादर केले नाही. अहवालासोबत मोजणीचा नकाशा जोडलेला आहे. त्यामध्ये असे दिसून येते की, ज्या ठिकाणी कुंपण भिंत असून सदर ठिकाणी गट नं. ९५९ ची वहीवाट आहे. परंतु, या वहिवाटीचे अंतर योग्य एककामध्ये नमुद केलेले नाही. उप-अधिक्षक भुमी अभिलेख बार्शी यांनी हे अंतर किती फुट किंवा किती मीटर लांबीचे व रुंदीचे आहे हे नमूद करणे गरजेचे आहे जेणेकरुन गट नं. ९५९ च्या धारकाने गट नं. ९६० मध्ये किती अतिक्रमण केले हे दिसून येईल. परंतु, ही बाब नमूद नकाशात नाही. त्यामुळे उप-अधिक्षक भुमी अभिलेख बार्शी यांना सदर बाब नकाशात नमूद करण्यासाठी आदेशीत करणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे दोन्ही पक्षातील वाद संपुष्टात येण्यास मदत होईल. करिता पुढील आदेशः-

## आदेश

१. निशाणी क्र. ५१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उप-अधिक्षक भुमी अभिलेख बार्शी यांना असे आदेशित करण्यात येते की, मो.र. नं. ४४७४/२०१८ मधील मोजणी नकाशा/अहवालात ज्या जागेवर कुंपण भिंत असून सदर ठिकाणी गट नं. ९५९ ची वहिवाट आहे त्या वहिवाटीची लांबी व रुंदी याचे अंतर मीटर किंवा फुट मध्ये नमूद नकाशात करण्यात यावे.

३. तसा अहवाल १ महिन्याच्या आत न्यायालयात सादर करावा.

Digitally signed by Santosh Bholaram Vijaykar
Date: 2023.02.22 10:54:50 +0530

बार्शी.
ता. २१/०२/२०२३.

( एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | B.B.Salvade |
| (b) | Court | : | S.B.Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 21/02/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 22/02/2023 |